# नियमित दिवाणी दावा क्र.६२/२०११ मधील

# निशाणी क्र.१७९ खालील आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. शेठ यांनी साक्षी समन्स काढण्यासाठी सादर केला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की, साक्षीदार दाजी धोंडु सुतार यांना साक्ष समन्स काढण्यात आले होते, परंतु प्राप्त झालेल्या अहवालानुसार सदर साक्षीदार हे मयत आहेत. सदर साक्षीदार हे दावा मिळकतीतील घराचे बांधकाम करीत होते. त्यामुळे त्यांची पत्नी शांताबाई दाजी सुतार यांची साक्ष नोंदविणे आवश्यक आहे. सबब, शांताबाई दाजी सुतार यांना साक्ष समन्स काढण्याची विनंती केली आहे.

**०२.** सदर अर्जावर वादीकरीता विधीज्ञ श्री.दामले यांनी म्हणणे देऊन प्रस्तुत अर्जाला विरोध दर्शविला. विधीज्ञ श्री. दामले यांचे असे कथन आहे की, मयत साक्षीदाराच्या पत्नीने घराचे बांधकाम केले होते असे प्रतिवादीचे कुठेही म्हणणे नाही. मयत साक्षीदाराच्या पत्नीची काय भुमिका होती हे सुध्दा प्रतिवादी सांगू शकत नाहीत. मयत साक्षीदाराच्या पत्नीला तथाकथित कामाबद्दल वैयक्तिक ज्ञान असण्याचे कारण नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जातील कथन तसेच त्यावर दिलेले म्हणणे विचारात घेतले. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी स्वतःचा पुरावा नोंदवुन पुरशिस निशाणी ३५ नुसार त्यांचा पुरावा बंद केला. तद्नंतर प्रतिवादी श्री. उमेश धोंडु खेडकर यांनी स्वतःचा पुरावा नोंदविला. तसेच प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार त्यांनी दिनेश रमेश पटेल यांच्याकडून सिमेंट व ब्लॉक खरेदी केले होते. त्यामुळे प्रतिवादींनी दिनेश रमेश पटेल यांचा पुरावा नोंदविला. तद्नंतर प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी चिराग मार्बल येथून टाईल्स खरेदी केले होते. त्यामुळे प्रतिवादींनी चिराग मार्बलचे व्यवस्थापक वैभव शरद जंगम यांची साक्ष नोंदविली. तद्नंतर प्रतिवादींनी दि.२७.०१.२०१० च्या पावतीवरील हस्ताक्षर व सदर पावती सिध्द करण्यासाठी चिराग मार्बल येथील लादी कटींगचे काम करणारे आकेश अनंत कडू यांची साक्ष नोंदविली. तद्नंतर प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार त्यांनी लक्ष्मी सॉ मिल येथून लाकडे चिरुन घेतली होती. सदर बाब व त्यासंबंधीचे बिल सिध्द करुन घेण्यासाठी प्रतिवादींनी लक्ष्मी सॉ मिलचे व्यवस्थापक निलेश मधुसुदन शिरोडकर यांची साक्ष नोंदविली. तद्नंतर प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी मे. चंदुलाल

दामोदरदास तलाठी या फर्ममधून टाईल बॉक्स व बॉर्डर पट्टी खरेदी केले होते. त्यामुळे सदर बाब व त्यासंबंधित पावत्या सिध्द करुन घेण्यासाठी सदर फर्मचे प्रोप्रायटर अरविंद चंदुलाल तलाठी यांची साक्ष नोंदविली. तद्नंतर प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार दाजी धोंडु सुतार यांनी दावा मिळकतीतील घराचे बांधकाम केले होते. त्यामुळे त्यांनाही साक्ष समन्स काढण्यात आले होते. सदर साक्षीदार हे मयत असल्यामुळे प्रतिवादी यांना आता दाजी धोंडू सुतार यांची पत्नी शांताबाई दाजी सुतार यांना साक्षीसाठी न्यायालयासमक्ष बोलवायचे आहे. एकंदरीत असे दिसून येते की, प्रतिवादी हे आधी कुठलीही साक्षीदारांची यादी न देता आता एका पाठोपाठ एक असे साक्षीदार तपासत आहेत. सदर पध्दत ही दिवाणी प्रक्रिया संहितेस तसेच भारतीय पुरावा कायद्यास अभिप्रेत नाही. या नंतर वादी हे आणखी किती साक्षीदार तपासणार आहेत हेसुध्दा अद्याप अस्पष्ट आहे. अशा पध्दतीने दिवाणी स्वरुपाचे दावे अनंत काळ साक्षी पुराव्यासाठी प्रलंबित राहतील. शांताबाई दाजी सुतार यांची नेमकी काय भुमिका होती याबाबत प्रस्तुत अर्जामध्ये काहीही नमुद केलेले नाही. प्रतिवादी हे कोण–कोण साक्षीदार तपासणार आहेत याची पुर्वकल्पना विरुध्द पक्षाला असणे दिवाणी प्रक्रिया संहितेला अभिप्रेत आहे. प्रस्तुत अर्जामध्ये कोणतेही संयुक्तिक कारण व स्पष्टीकरण नसल्यामुळे सदर अर्ज हा फेटाळण्यालायक आहे. करीता, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज **निशाणी १७९** नामंजूर करण्यात येतो.

CHAVAN SANJAY MOTIRAM

Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.04.16 16:30:17 +0530

**(एस. एम. चव्हाण)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खेड
ता. खेड, जि. रत्नागिरी.

**दिनांक – १६.०४.२०२६**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No.62/2011 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 16.04.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 16.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 16.04.2026 |